# पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील

# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१७-१८ प्रसिध्दी निवेदन

## प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (FCFS- First Come First Serve)

## दि.१८.०८.२०१७.

---------

इ. ११वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. त्यानुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१७-१८ साठी पहिल्या विशेष फेरीतील गुणवत्ता यादी दिनांक १६.०८.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजता जाहीर करण्यात आलेली आहे व त्याचे प्रवेश दि. १९.०८.२०१७ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत लिंक सुरु राहणार आहेत.

यानंतर अद्याप कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यां सोबतच यापुर्वी प्रवेश घेतलेले परंतु काही कारणांमुळे घेतलेला प्रवेश रद्द केलेले विद्यार्थी यांच्यासाठी प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (FCFS- First Come First Serve) ही ऑनलाईन प्रवेश फेरी घेण्यास शासनाची मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि. २१.०८.२०१७ पासून या फेरीतील प्रवेश प्रक्रिया सुरु होईल.

प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य (FCFS- First Come First Serve) या ऑनलाईन प्रवेश फेरीसाठी रिक्त जागांचा तपशिल रविवार दिनांक २०.०८.२०१७ रोजी सायंकाळी प्रवेशाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. या फेरीची सविस्तर वेळापत्रक, कार्यपध्दती व मार्गदर्शक सूचना दि. १९.०८.२०१७ रोजी इ.११ वी ऑनलाईन प्रवेशाच्या संकेतस्थळावर व पुणे-पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील वर्तमानपत्रात प्रसिध्द केल्या जातील.

MRaut 18.8.17

(मिनाक्षी राऊत)
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१